जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 SEP 2021
लोकमत

# शिवाजी विद्यापीठ घेणार आजपासून पुनर्परीक्षा

## तीस अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** काही तांत्रिक कारणास्तव शिवाजी विद्यापीठाची परीक्षा देता आली नसलेल्या ८,८४५ विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा देण्याची संधी परीक्षा व मूल्यमापन मंडळाने उपलब्ध करून दिली आहे. या विद्यार्थ्यांची नोंदणी करून घेत, त्यांची पुनर्परीक्षा आज (गुरूवार)पासून ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. बी. व्होक फूड प्रोसेसिंग अ‍ॅण्ड मॅनेजमेंट, एम. ए. इंग्रजी अशा विविध तीस अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल विद्यापीठाने बुधवारी ऑनलाईन जाहीर केले.

एम. एस्सी. अल्कोहोल टेक्नॉलॉजी, बी. एस्सी अथवा एम. एस्सी. नॅनो सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी, एम. एस्सी. शुगर टेक्नॉलॉजी, एम. बी. ए. रूरल मॅनेजमेंट, एम. बी. ए. डिस्टन्स मोड आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी एकूण ९८५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ७३६ जणांनी परीक्षा दिली. उन्हाळी सत्रातील बी. एस्सी., एम. एस्सी. (नॅनो सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी) या अभ्यासक्रमाची १२१ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. एम. ए. राज्यशास्त्र, एम. कॉम., एम. एस्सी. बॉटनी, एम. एस्सी. अ‍ॅग्रो केमिकल अ‍ॅण्ड पेस्ट मॅनेजमेंट, एमसीए, एम. ए., एम. एस्सी., एम. एम. मराठी, हिंदी (सत्र तीन आणि चार), डिप्लोमा इन सायबर लॉ, लेबर लॉ अशा विविध ३० परीक्षांचे ऑनलाईन निकाल विद्यापीठाने जाहीर केले.

### विद्यार्थ्यांना आवाहन

पुनर्परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे संकेतस्थळ, स्वत:चा ई-मेल, नोंदणीकृत मोबाईलवर येणाऱ्या परीक्षांबाबतच्या सूचना वारंवार पाहाव्यात. अद्याप ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरु झालेली नाही, त्यांनी मॉक टेस्ट द्यावी, असे आवाहन परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 SEP 2021
सकाळ



कोल्हापूर : असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् अँड इंजिनिअर्स असोसिएशनतर्फे बुधवारी अभियंता दिनानिमित्त मोक्षगुंडम विश्वेसरय्या यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना मिलिंद पाटील, संजयकुमार चव्हाण, धनंजय खोत आदी.

# महापुराची कारणे, उपायांसाठी अभ्यास गट

## आर्किटेक्टस् असोसिएशनतर्फे पूर स्थितीवर चर्चा

कोल्हापूर, ता. १५ : असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् अँड इंजिनिअर्सतर्फे असोसिएशनचे कार्यालयात आज मोक्षगुंडम विश्वेसरय्या यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून ५४ वा अभियंता दिन साजरा झाला. अभियंता दिनानिमित्त महापुराचे कारण, उपायांसाठी अभ्यास गटाची स्थापना केली. महिन्यापूर्वी झालेल्या असोसिएशनच्या सुवर्णमहोत्सवी वर्धापन दिनाच्या मुख्य कार्यक्रमात जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी अभ्यासगट स्थापन करण्याची सूचना केली होती. त्याची पहिली बैठक अभियंता दिनानिमित्त झाली.

असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे यांनी अभ्यास गट स्थापण करण्याचे उद्दिष्ट स्पष्ट करत शहर व जिल्हा परिसरातील महापुराच्या पाण्याची पातळी वाढू नये व पाणी जलदगतीने पुढे वाहून जावे, यासाठी मते नोंदवावीत, असे आवाहन केले, त्यानुसार विविध संस्था व विभाग प्रतिनिधिंनी मते नोंदवली. यापुढे आणखी काही संबंधित संस्था व विभाग यांचा सहभाग वाढवून बैठका घेऊन अंतिम अहवाल असोसिएशनतर्फे शासनास देणार असल्याचेही कोराणे यांनी जाहीर केले. बैठकीत शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागप्रमुख सचिन पन्हाळकर, प्राधिकरण मुख्य कार्यकारी अधिकारी संजयकुमार चव्हाण, नगररचना उपसंचालक धनंजय खोत, पाटबंधारे विभाग अधिकारी मनोज पारकर, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत व उपशहर अभियंता हर्षजित घाटगे, केआयटीचे मोहन चव्हाण, प्रा. शीतल वरुर, मिलिंद पाटील अभय जोशी, प्राचार्य विनय शिंदे, प्रा. संदीप घाटगे उपस्थित होते.